महाराष्ट्र पोलीस

# पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग, ठाणे शहर

तीन हात नाका, एल. बी. एस. मार्ग, नौपाडा, ठाणे (पश्चिम)
दुरध्वनी क्रमांक – ०२२–२५४०१०५६
Email ID – cp.thane.dcptraffic@mahapolice.gov.in

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

जा.क्र. पोउपआ/वावि/अधिसूचना/ ९४ /२०२४ दि. ०८/०५/२०२४

## –: वाहतूक नियंत्रण अधिसूचना :–

**ज्याअर्थी,** ठाणे महानगरपालिका कार्यक्षेत्रातील लोकमान्य सावरकर नगर प्रभाग समिती अंतर्गत **वागळे** वाहतूक उपविभागाचे हद्दीत महाराष्ट्र वॉच कंपनी कॉर्नर ते रूपादेवी मैदान पाणी वितरणासाठी पंप बांधण्यात आलेला आहे. सदर पंपाला इनलेट व आऊटलेट लोखंडी जलवाहिनी टाकून पंप कार्यान्वित करण्यासाठी रस्त्याचे एका बाजूस ४०० मीटर लांब, ५.५ फूट रूंद, ५.५ फुट खोल खोदकाम करून ६०० मीटर व्यासाची लोखंडी पाईपलाईन टाकण्यात येणार आहे. सदर परिसरात वाहतूक कोंडी होऊ नये व परिसरातील वाहतूक सुरळीत व सुनिश्चित राहणे आम जनतेच्या सोईसाठी आवश्यक आहे.

**त्याअर्थी,** मी **डॉ. विनयकुमार मे. राठोड, पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग, ठाणे शहर** म्हणून, मला महाराष्ट्र शासन गृहविभाग क्र. एम.व्ही.ए.–११६/सीआर/३७/टीआर, दि. २७/०९/१९९६ चे अधिसुचनेनुसार मोटार वाहन कायदा कलम ११५, ११६ (१)(अ)(ब) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकाराचा वापर करून पुढील प्रमाणे अधिसुचना जारी करीत आहे.

**प्रवेश बंद –** १) रूपादेवी मैदान कडून जोष्ट बिल्डींग कडे जाणाऱ्या सर्व प्रकारच्या वाहनांना **शतिष किराणा जनरल स्टोअर्स दुकानासमोर 'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे.

**पर्यायी मार्ग –** सदर वाहने शतिष किराणा जनरल स्टोअर्स येथून उजवीकडे वळून मा. नगरसेवक विलास काळे यांच्या ऑफिसकडून डावीकडे वळून श्रीमाल मेडिकल येथून डावीकडे वळून पुढे सरळ गाढवगल्ली येथून डावीकडे वळून खाली सरळ नाव्य ज्वेलर्स येथून पुढे इच्छीत स्थळी जातील.

**प्रवेश बंद –** २) जोष्ट बिल्डींग कडून/नाव्य ज्वेलर्स कडून रूपादेवी मैदान कडे जाणाऱ्या सर्व प्रकारच्या वाहनांना **जोष्ट बिल्डींग येथे 'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे.

**पर्यायी मार्ग –** सदर वाहने नाव्य ज्वेलर्स येथून डावीकडे वळून गाढवगल्ली येथून सरळ वर जावून उजवीकडे वळून श्रीमाल मेडिकल येथून उजवीकडे वळून मा. नगरसेवक विलास काळे यांच्या ऑफिसकडून उजवीकडे सरळ खाली येवून शतिष किराणा जनरल स्टोअर्स येथून डावीकडे वळून इच्छीत स्थळी जातील.

सदरची वाहतूक अधिसूचना दि.०८/०५/२०२४ ते दि. ३१/०५/२०२४ रोजीपर्यंत २४ तास अंमलात राहील.

**( डॉ. विनयकुमार मे. राठोड )**
पोलीस उप आयुक्त,
वाहतूक विभाग, ठाणे शहर.

**प्रति,**

जिल्हा माहिती अधिकारी, जिल्हा माहिती अधिकारी कार्यालय ठाणे.
२/– सदर अधिसूचना प्रसिध्द करण्यास विनंती आहे.

**प्रत माहितीसाठी सादर,**

मा. पोलीस आयुक्त, ठाणे शहर
मा. पोलीस सह आयुक्त, ठाणे शहर
मा. आयुक्त, ठाणे महानगरपालिका, ठाणे
मा. जिल्हाधिकारी, ठाणे
मा. अपर पोलीस आयुक्त, पश्चिम प्रादेशिक विभाग, ठाणे शहर

**प्रत कार्यवाहीकरीता :—**
प्रादेशिक परिवहन अधिकारी, ठाणे
नियंत्रण कक्ष अधिकारी, ठाणे.
परिवहन व्यवस्थापक, ठाणे महानगरपालिका, ठाणे.
विभाग नियंत्रक, महाराष्ट्र राज्य परिवहन, ठाणे
पोलीस उप आयुक्त, परिमंडळ—१ ठाणे, परिमंडळ—५ वागळे इस्टेट व विशेष शाखा, ठाणे.

**प्रत** :— पोलीस उप आयुक्त, आर्थिक गुन्हे, ठाणे शहर
२/— सदर अधिसूचना नागरीकांच्या माहितीसाठी ठाणे शहर पोलीस वेबसाईटवर प्रसिध्दी होणेस विनंती आहे.

**प्रत** :— समन्वय अधिकारी, ९ ए.एस.कक्ष, ठाणे
२/— सदर अधिसूचना पोलीस नोटीसमध्ये प्रसिध्दीसाठी.

**प्रत** :— संबंधित सपोआ वाहतूक विभाग व सर्व संबंधित प्रभारी अधिकारी, वाहतूक उपविभाग.
२/— म.न.पा.ठाणे च्या संबंधीत अधिकाऱ्यांकडून आवश्यक सूचना फलके लावून घ्यावी